**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक –**१३/११/२०२३**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१०**
**नोव्हेंबर २०२३**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **सोमवार,दि.२०/११/२०२३** रोजी **दुपारी ४.०० (चार)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र. २५४**

**संदर्भ–** १) शहर सौदर्यीकरण कक्ष शहर अभियंता कार्यालयजा.क्र.मआ/शअजा/१४०१३,दि.२/१२/२०२२
२) मा.अति.महापालिका आयुक्त (ई) यांचे जा.क्र.अतिमआ(ई)/घनकव्यका/४७५३,दि.६/१२/२०२२ रोजीचे कार्यालयीन परिपत्रक
३) मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र.अतिमआ(ई)/घनकव्यका/४८५४,दि.९/१२/२०२२ रोजीचे कार्यालयीन परिपत्रक
४) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.१/६८२, दि. २३/१०/२०२३ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र.७७२,दि.१/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत जी–२० उपक्रमांतर्गत शहर सौंदर्यीकरण मोहीम राबविणेसाठी भिंती रंगविणे, हे काम आवश्यक व तातडीने करावयाच्या अनुषंगाने ठेकेदार मे.भोसेकर कन्स्ट्रक्शन व मे.श्री.संदिप मुरलीधर सराटे, मे.जे.बी.चव्हाण , मे.प्रबुद्ध स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्या., मे. रेयांश एंटरप्रायजेस यांचेकडून खालील नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे दि.०५/०१/२०२३ ते दि. १८/०१/२०२३ दरम्यान केलेल्या कामांची पुणे मनपा दरपत्रकानुसार होणारी रक्कम घनकचरा विभागाकडून SI25A129-26 या बजेट कोडवर तरतूद उपलब्ध करून ठेकेदारास केलेल्या कामाचे बिल अदा करणे व त्यांचे समवेत करारनामा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये करण्यात आलेल्या कामांची माहिती मा. मुख्य सभा , पुणे महानगरपालिका यांच्याकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव | झालेला खर्च | जीएसटी | झालेला खर्च जीएसटी सह |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय पार्क ते नागपुरचाळ | मे.संदिप सराटे | ८७४३१२.७५ | १५७३७६.०० | १०३१६८९.०० |
| २ | गोल्फ चौक ते गुंजन चौक | मे.संदिप सराटे | ६२५८६४.०० | ११२६५६.०० | ७३८५२०.०० |
| ३ | बदामी चौक ते गोल्फ चौक | मे.भोसेकर कन्स्ट्रक्शन | ९५२८३८.०० | १७१५११.०० | ११२४३४९.०० |
| ४ | एअरपोर्ट चौक ते नागपुरचाळ डावी बाजू व एअरपोर्ट चौक ते आगाखान पुल कल्याणीनगर | मे.प्रबुद्ध स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्या. | ५८५१९३.०० | १०५३३५.०० | ६९०५२८.०० |
| ५ | एअरपोर्ट चौक ते एरोमॉल पार्किंग व एअरपोर्ट चौक ते ५०९ चौक डावी बाजु | मे.जे.बी.चव्हाण | ६६८७५०.०० | १२०३७५.०० | ७८९१२५.०० |
| ६ | संजयपार्क ते नागपूरचाळ (आर्ट वर्क ) | मे. रेयांश एंटरप्रायजेस | ९२२९७.०० | १६६१३.०० | १०८९१०.०० |
| | एकूण | | | | ४४८३१२१.०० |

**विषय क्र. २५५**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/७२६, दि.२६/१०/२०२३ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.७९१,दि.१/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा.पंतप्रधान यांच्या दि.१/८/२०२३ रोजी पुणे भेटी दरम्यान शिवाजीनगर पोलीस ग्राऊंड, एस.पी.कॉलेज ग्राऊंड व कृषी महाविद्यालय येथे करण्यात आलेल्या मंडप व बैठक व्यवस्था व इतर तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामांची देयके महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये आदा करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) भारताचे मा.पंतप्रधान यांच्या दि.१/८/२०२३ रोजी पुणे भेटी दरम्यान शिवाजीनगर पोलीस परेड ग्राऊंड, एस.पी.कॉलेज ग्राऊंड व कृषी महाविद्यालय येथे मंडप व बैठक व्यवस्था व इतर तदनुषंगिक स्थापत्य विषयक केलेल्या कामांची खालीलप्रमाणे र.रू.१,८५,०१,४७९.६६/–(जीएसटी सह ), अक्षरी र.रू एक कोटी पंच्याऐंशी लक्ष एक हजार चारशे ऐकोणऐंशी रूपये सहासष्ट पैसे फक्त ( जीएसटी सह ) खर्चाची देयके

अ) ठेकेदार मे.मेराकी इवेन्ट्स यांचे र.रू.३१,८५,२४५.३३ ( जीएसटीसह, पूर्वीची मान्यता ) अधिक र.रू. ९३,०६,९३३.७६/–( जीएसटीसह, चालू मान्यता ) म्हणजेच एकूण र.रू.१,२४,९२,१७९.०९/– ( जीएसटी सह )

ब) ठेकेदार मे.श्री.बालाजी मंडप डेकोरेटर्स र.रू.२१,३०,३९९.२८/– ( जीएसटीसह, पूर्वीची मान्यता ) अधिक र.रू.२७,७८,४६६.०९/– ( जीएसटीसह, चालू मान्यता ) म्हणजेच एकूण र.रू.४९,०८,८६५.३७ ( जीएसटीसह )

क) ठेकेदार मे.सारंग निवृत्ती येनपुरे र.रू.२,११,६५०.२०/– ( जीएसटीसह)

ड) ठेकेदार श्री.कमलेश स.जडे र.रू.८,८८,७८५/–( जीएसटीसह)

यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये त्यांचे ॲटपार दराने आदा करण्यात येणार असल्याची व त्यासाठी त्यांचे समवेत आता कोणताही करारनामा न केलेची व कोणतीही अनामत रक्कम न घेतलेली बाब.

२) वरीलप्रमाणे केलेल्या कामाचा खर्च वर्गीकरणाद्वारे तरतूद उपलब्ध झाल्याने CE22A548/J10-83 पुणे मनपाच्या विविध शासकीय कामासाठी मंडप व्यवस्था व बैठक व्यवस्था करणे ( योगा दिन, लोक अदालत, मराठी भाषा दिन, मनपा वर्धापन दिन व इतर शासकीय कार्यक्रम ) या अर्थशिर्षकामधून करण्यात येणार असल्याची बाब.

**विषय क्र. २५६**

**संदर्भ–** १) मा. स्थायी समिती ठराव क्र.१७४३, दिनांक १७/२/२०२३.
२) आरोग्य कार्यालय जा.क्र. एचओ/१०३९२, दि.२१/२/२०२३.
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७४९,दि. ३०/१०/२०२३ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र.८४५,दि.८/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या कै. अरविंद गणपत बारटक्के दवाखाना, वारजे दवाखाना विठ्ठल रुक्मिणी समाज मंदिर(संत सेवालाल हॉल) स.नं. ४५ विठ्ठलनगर वारजे माळवाडी , वारजे पुणे येथे स्थलांतरीत करणेस व खालील बाबीस व नविन जागेमध्ये कै. अरविंद गणपत बारटक्के दवाखना कार्यान्वित करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) कै. अरविंद गणपत बारटक्के दवाखाना, वारजे विठ्ठल रुक्मिणी समाज मंदिर(संत सेवालाल हॉल) स.नं. ४५ विठ्ठलनगर वारजे माळवाडी , वारजे पुणे येथे स्थलांतरीत करणेस.

२) नविन जागेमध्ये कै. अरविंद गणपत बारटक्के दवाखना कार्यान्वित करणेस आवश्यक त्या सोईसुविधा जसे फर्निचर, रंगरंगोटी, डायलेसिस युनिटकरिता आवश्यक विद्युत विषयक कामे व पाईपलाईन इ. कामांकरिता होणारा र. रु.२० लक्ष इतका खर्च करणेस व सदरचा खर्च अर्थशिर्षक सन २०२३–२४ CE17A242/SJ6-93 भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैदयकीय महाविदयालय या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

**विषय क्र. २५७**

**संदर्भ–** १) मा.वित्तीय समिती बैठक दिनांक २८.०८.२०२३ इतिवृत्त जा.क्र.२४२६, दि.०५.९.२०२३.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/७५०, दि. ३०/१०/२०२३ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र.८४६,दि.८/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण ४ कामांच्या रक्कम रुपये ३५० लक्षाच्या वर्गीकरणास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनिःस्सारण(प्रकल्प) विभाग,मलनिःस्सारण(प्रकल्प) विभागाकडील बजेट कोड–ZE16D103/MP4-11 राष्ट्रीय नदी सुधारणा अंतर्गत मुळा–मुठा सुधारणा करणेसाठी मैलापाणी व्यवस्थापन विषयक योजना राबविणे. (जायका)<br>एकूण उपलब्ध तरतूद र.रू.२०० कोटी | र.रू. ३.५ कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>मलनिःस्सारण देखभाल दुरूस्ती विभाग,<br>१)प्रभाग क्र.७ मध्ये शिवाजीनगर परिसरात ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक तसेच तदनुषंगिक कामे करणे. | --- | र.रू. ०.५ कोटी |
| २) प्रभाग क्र.१४ मधील महालेनगर व वडारवाडी परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे तसेच तदनुषंगिक कामे करणे. | --- | र.रू. १.५ कोटी |
| ३) प्रभाग क्र.१४ चाफेकरनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे तसेच तदनुषंगिक कामे करणे. | --- | र.रू. ०.५ कोटी |
| ४) प्रभाग क्र.७ मध्ये पाटील इस्टेट येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक तसेच तदनुषंगिक कामे करणे. | --- | र.रू.१ कोटी |

**विषय क्र. २५८**

**संदर्भ–** १) मा.वित्तीय समिती बैठक दिनांक २८.०८.२०२३ इतिवृत्त जा.क्र.२४२६, दि.०५.९.२०२३.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि/७५१, दि. ३०/१०/२०२३ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र.८४७,दि.८/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –
प्रभाग क्र. ८ मधील जगदिशनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणेसाठी खालीलप्रमाणे रक्कम रुपये २५ लक्षच्या वर्गीकरणास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनिःस्सारण देखभाल दुरूस्ती विभाग,<br>राष्ट्रीय नदी सुधारणा अंतर्गत मुळा–मुठा सुधारणा कामे करणेसाठी मैलापाणी व्यवस्थापन विषयक योजना राबविणे. (JICA) बजेट कोड – ZE16D103/MP4-11 एकूण उपलब्ध तरतूद २०० कोटी. | र.रू. २५ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम –<br>मलनिःस्सारण देखभाल दुरूस्ती विभाग,<br>१)प्रभाग क्र. ८ मधील जगदिशनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | र.रू. २५ लक्ष |

**विषय क्र. २५९**

**संदर्भ–** १) मा.मुख्य सभा ठ.क्र. ५०,दि.२०/५/२०१४.
२)मा.मुख्य सभा ठ.क्र. ७०,दि.२२/६/२०१५.
३) मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/३५१, दि. १०/८/२०२१.
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/पथ/७६९, दि.३१/१०/२०२३ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र.८४९,दि.८/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवावाहिन्या टाकणेसाठी महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळास सवलत देणेकरिता खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१.मे. महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळास रस्ते खोदाई शुल्क र.रु.१२,१९२/– प्रति र.मी.च्या ५०% सवलत देऊन र.रु. ६०९६/– प्रति. र.मी. आकारणेस.

**<u>विषय क्र. २६०</u>**

**संदर्भ–** १) मा. स्थायी समिती ठराव क्र.९३६, दि.०५/०१/२०२१.

२) मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/७९६, दि.०३/११/२०२३ चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्र.८५९,दि.८/११/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पब्लिक प्रायव्हेट पार्टनशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरुपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातुन विकसित करणे अंतर्गत कात्रज स. नं. ४२ व ५० मधील १२ मी रूंदीचा डी.पी. रस्ता आणि कात्रज स. नं. ४५,४४,४१,४३ व ४२ वाघजाई नगर ते गुजरवाडी मुख्य रस्त्यापर्यंत नाल्याच्या लगत असलेला १२ मी. रुंदीचा डी.पी. रस्ता पीपीपी तत्वावर विकसित करण्याकरिता खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१)पब्लिक प्रायव्हेट पार्टनशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरुपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातुन विकसित करणे अंतर्गत कात्रज स. नं. ४२ व ५० मधील १२ मी रूंदीचा डी.पी. रस्ता आणि कात्रज स. नं. ४५,४४,४१,४३ व ४२ वाघजाई नगर ते गुजरवाडी मुख्य रस्त्यापर्यंत नाल्याच्या लगत असलेला सुमारे १७५० मी लांबीचा रस्ता (२० मी लांबी व १२ मी रुंदीचे दोन कल्व्हर्टसह) व त्या अनुषंगाने नाल्यालगत ११५० मी लांबीकरिता रिटेनिंग वॉल विकसित करणे.

**<u>विषय क्र. २६१</u>**

**संदर्भ–** १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १५४६, दि.२३/११/२०२१.

२) मा. मुख्य सभा ठराव क्र. ७१९, दि.२३/१२/२०२१.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०४८, दि.९/११/२०२२.

४) मा. मुख्य सभा ठराव क्र. २८६, दि.०१/१२/२०२२.

५) आमचे कार्यालयाकडील श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, पुणे यांचे नसआक्र– १३७६, दि.०५/०९/२०२३ रोजीचे पत्र.

६) मा. नगरसचिव कार्यालय यांचे जा.क्र. १२६९, दि.०३/११/२०२३ चे पत्र.

७) स्थायी समिती ठराव क्र.८६६,दि.८/११/२०२३

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका आणि श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आग्र्याहून सुटका स्मृतीदिन सोहळा साजरा करण्यात येत आहे. यंदाचे हे ४३ वे वर्ष आहे. या निमित्ताने पुणे येथे लाक्षणिक पालखी सोहळा रविवार दि.१० डिसेंबर २०२३ रोजी लाल महल येथे आयोजित करण्यात येणार आहे. प्रतीवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील दि.१६व १७ डिसेंबर २०२३ रोजी आग्राहून सुटका स्मृतीदिन किल्ले राजगडावर व पाल खु.येथील खंडोबाचा माळ येथे साजरा केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी र.रु. २,९९,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) इतकी देणगी खालील अर्थशिर्षकातून संबंधितांस उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक
१.मुख्य देखरेख वसुली वगैरे
क. महानगरपालिका व स्थायी समिती
१. नगरसचिव यांचे कार्यालय
पान क्र. १४१
यादी क्र.R2
बजेट कोडRE11A275/ R2-3
शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून परत आले तो स्मृतीदिन साजरा करणे.
मान्य तरतूद रक्कम रुपये ५,१५,०००/–
(अक्षरी रक्कम रुपये पाच लाख पंधरा हजार फक्त)

प्र.नगरसचिव
पुणे महानगरपालिका